# एनएसईच्या आयपीओत एसबीआय कॅपिटल मार्केट्सही समभाग विकणार

**मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी) :** राष्ट्रीय शेअर बाजाराच्या (एनएसई) प्रस्तावित प्राथमिक समभाग विक्रीत (आयपीओ) आता एसबीआय कॅपिटल मार्केट्स (एसबीआयसीएपीएस) हा विक्री समभागधारक म्हणून सहभागी होणार आहे. एसबीआयसीएपीएसकडून एनएसईचे तब्बल ८७.८ लाख समभाग विक्रीसाठी उपलब्ध केले जाणार आहेत. या निर्णयामुळे आयपीओची एकूण आकारमानात कोणताही बदल होणार नाही.

एनएसईने १७ जून २०२६ रोजी दाखल केलेल्या प्राथमिक माहितीपत्रकातील बदलाबाबत गुंतवणूकदारांना दिलेल्या सूचनेत ही माहिती जाहीर केली आहे. यापूर्वी स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) एनएसईचे २.४७५ कोटी समभाग विकणार होती. आता ही विक्री एसबीआय आणि एसबीआयसीएपीएस या दोन संस्थांमध्ये विभागली जाणार आहे. एसबीआयकडून १.५९७ कोटी, तर एसबीआयसीएपीएसकडून ८७.८ लाख समभाग विकले जाणार आहेत.

विशेष म्हणजे, एसबीआयसीएपीएस ही एनएसईच्या आयपीओची प्रमुख व्यवस्थापक संस्थांपैकी एक आहे. समभाग विक्रीधारक म्हणून तिचा सहभाग हा आयपीओच्या विपणनासाठी प्रमुख व्यवस्थापक म्हणून असलेल्या भूमिकेव्यतिरिक्त असेल. एसबीआयसीएपीएसने २००७-०८ दरम्यान विविध संस्थांकडून एनएसईचे समभाग हस्तांतरणाद्वारे मिळवले होते. नोव्हेंबर २०२४ मध्ये चारच्या बदल्यात एक बोनस समभाग या प्रमाणात झालेल्या बोनस इश्यूमधून कंपनीला आणखी ८.५८ कोटी समभाग मिळाले.

एसबीआयसीएपीएसकडून विक्री होणाऱ्या समभागांची भारित सरासरी खरेदी किंमत प्रति समभाग ०.३८ रुपये आहे. एसबीआयकडून विक्री होणाऱ्या समभागांसाठी ही किंमत ०.८० रुपये आहे. एनएसईच्या आयपीओमध्ये एमएस स्ट्रॅटेजिक (मॉरिशस), कॅनडा पेन्शन प्लॅन इन्व्हेस्टमेंट बोर्ड, बँक ऑफ बडोदा, स्टॉक होल्डिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, न्यू इंडिया ॲश्युरन्ससह अन्य भागधारकही समभाग विकणार आहेत.

एनएसईचा प्रस्तावित आयपीओ सुमारे ३० हजार कोटी रुपयांचा असण्याचा अंदाज असून, तो देशातील सर्वात मोठ्या सार्वजनिक भागविक्रींपैकी एक ठरण्याची शक्यता आहे. या आयपीओकडे देशांतर्गत तसेच परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांचे विशेष लक्ष राहण्याची अपेक्षा आहे. एनएसईच्या दीर्घ प्रतीक्षेत असलेल्या सूचीबद्धतेमुळे भांडवली बाजारातील गुंतवणूकदारांसाठी हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. हा संपूर्ण आयपीओ 'ऑफर फॉर सेल' पद्धतीचा असल्याने त्यातून मिळणारी रक्कम एनएसईला नवीन भांडवल म्हणून मिळणार नसून विद्यमान समभागधारकांना प्राप्त होणार आहे.

## शंकेश ज्वेलर्सचा आयपीओ १८ ऑगस्टपासून खुला होणार

**मुंबई, दि. १० (वृत्तसंस्था) :** शंकेश ज्वेलर्स लिमिटेडने प्राथमिक समभाग विक्री अर्थात आयपीओ १८ ऑगस्ट २०२६ पासून खुला करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. प्रमुख गुंतवणूकदारांसाठी बोली प्रक्रिया १७ ऑगस्टला होणार असून, सर्वसामान्य गुंतवणूकदारांसाठी सुरू झालेली बोली २० ऑगस्टला बंद होईल. कंपनीने प्रत्येकी पाच रुपये दर्शनी मूल्य असलेल्या समभागासाठी ८८ ते ९३ रुपये असा किंमतपट्टा निश्चित केला आहे.

गुंतवणूकदारांना किमान १६० समभागांसाठी बोली लावता येणार असून, त्यानंतर १६० समभागांच्या पटीत बोली करता येईल. या आयपीओमध्ये २,७४२ दशलक्ष रुपये म्हणजेच २७४.२ कोटी रुपयांपर्यंतच्या २,९४,८२,००० समभागांचा ताजा समभाग विक्री प्रस्ताव समाविष्ट आहे. याशिवाय ९३० दशलक्ष रुपये म्हणजेच ९३ कोटी रुपयांपर्यंतच्या १ कोटी समभागांचा विद्यमान समभागधारकांकडून विक्री प्रस्ताव समाविष्ट करण्यात आला आहे.

त्यामध्ये कांतिलाल खीमराज जैन यांच्याकडून ४८ लाखांपर्यंतचे, तर मनोज कांतिलाल जैन यांच्याकडून ५२ लाखांपर्यंतचे समभाग विक्रीसाठी उपलब्ध असतील. अशा प्रकारे या आयपीओच्या माध्यमातून कंपनीकडून ताज्या समभागांची विक्री केली जाणार असून, प्रवर्तकांकडूनही त्यांच्या समभागांपैकी काही हिस्सा विक्रीसाठी आणला जाणार आहे.

---

**बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda**

**बँक ऑफ बडोदा, मुंबई मेट्रो पश्चिम विभागः**
शारदा भवन, श्री वैकुंठला मेहता मार्ग, मिठीबाई कॉलेजच्या समोर, जुहू विलेपार्ले, मुंबई - ४०००५६.
**ई-मेलः** recovery.mmwr@bankofbaroda.com

### शुद्धीपत्रक

कृपया दिनांक **०७.०८.२०२६** रोजी फायनान्शियल एक्सप्रेस आणि दैनिक प्रातःकाल या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झालेल्या आमच्या **"स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री नोटीस"** चा संदर्भ घ्यावा. सदर नोटीसमध्ये, अ. क्र. ०८ वरील कर्जदार मे. यश प्लास्टोमेट प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संदर्भात, लिलावाची तारीख अनावधानाने चुकीची नमूद करण्यात आली होती. **लिलावाची तारीख त्यात नमूद केलेल्या तारखेऐवजी २५/०८/२०२६ अशी वाचण्यात यावी.** सदर नोटिशीतील इतर सर्व अटी आणि शर्ती जशाच्या तशा राहतील.

**दिनांकः** ११.०८.२०२६
**ठिकाणः** मुंबई

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी,**
**बँक ऑफ बडोदा**

---

### जाहीर नोटीस

याद्वारे माझे अशील १). श्रीमती लक्ष्मीदेवी अजय विश्वकर्मा आणि २). श्री. अजय शिवनाथ विश्वकर्मा यांच्या वतीने नोटीस दिली जात आहे, जे खालील मालमत्ता एका श्रीमती इव्हेंजेलिन ग्लॅडिन यांच्याकडून खरेदी करण्यास इच्छुक आहेतः (i). फ्लॅट क्र. १००७, ज्याचे चटई क्षेत्रफळ २६.४७ चौ. मीटर असून ते ३१.७६ चौ. मीटर बिल्ट-अप क्षेत्राच्या समतुल्य आहे, जो 'महावीर प्लॅटिनम' नावाच्या इमारतीच्या ए विंगमधील दहाव्या मजल्यावर स्थित आहे. ही इमारत महावीर प्लॅटिनम को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेडची असून, ती नोंदणी उप-जिल्हा आणि जिल्हा मुंबई उपनगर, घाटकोपर मानखुर्द लिंक रोड, गोवंडी, मुंबई ४०० ०४३ येथील मौजे बोरला, तालुका कुर्ला येथील सर्व्हे क्र. ९६, हिस्सा क्र. १ (पी) आणि संबंधित सी.टी.एस. क्र. ४ए/१ आणि ४/ए/२ या जमिनीवर बांधलेली आहे (ज्याला यापुढे 'सदर फ्लॅट क्र. १००७' असे संबोधले जाईल) आणि
(ii). फ्लॅट क्र. १००८, ज्याचे चटई क्षेत्रफळ २८.०५ चौ. मीटर असून ते ३३.६६ चौ. मीटर बिल्ट-अप क्षेत्राच्या समतुल्य आहे, जो 'महावीर प्लॅटिनम' नावाच्या इमारतीच्या ए विंगमधील दहाव्या मजल्यावर स्थित आहे. ही इमारत महावीर प्लॅटिनम को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेडची असून, ती नोंदणी उप-जिल्हा आणि जिल्हा मुंबई उपनगर, घाटकोपर मानखुर्द लिंक रोड, गोवंडी, मुंबई ४०० ०४३ येथील मौजे बोरला, तालुका कुर्ला येथील सर्व्हे क्र. ९६, हिस्सा क्र. १ (पी) आणि संबंधित सी.टी.एस. क्र. ४ए/१ आणि ४/ए/२ या जमिनीवर बांधलेली आहे (ज्याला यापुढे 'सदर फ्लॅट क्र. १००८' असे संबोधले जाईल) (यापुढे सदर फ्लॅट क्र. १००७ आणि सदर फ्लॅट क्र. १००८ या दोन्हीला एकत्रितपणे 'सदर मिळकत' असे संबोधले जाईल).
मूळतः रेन्बो कन्स्ट्रक्शन कंपनीकडून दिनांक १८.०८.२००७ च्या दोन स्वतंत्र विक्री करारांद्वारे एका श्री. कार्तिक बालन यांनी सदर फ्लॅट क्र. १००७ आणि सदर फ्लॅट क्र. १००८ खरेदी केले होते. फ्लॅट खरेदीदारांनी महावीर प्लॅटिनम को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड या नावाने एक संस्था (सोसायटी) स्थापन करून तिची नोंदणी क्र. एमयूएम/डब्ल्यूएम/एचएसजी/टीसी/१०४५२/२०११-१२ अन्वये नोंदणी केली. सोसायटीने श्री. कार्तिक बालन यांना सभासद म्हणून सामावून घेतले आणि त्यांच्या नावे (i). अनुक्रमांक १४३१ ते १४४० असे १० शेअर्स असलेले शेअर प्रमाणपत्र क्र. १४४ आणि (ii). अनुक्रमांक १४४१ ते १४५० असे १० शेअर्स असलेले शेअर प्रमाणपत्र क्र. १४५ जारी केले. सदर श्री. कार्तिक बालन यांचे दिनांक ३०.०८.२००९ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचे वारस आणि कायदेशीर प्रतिनिधी म्हणून केवळ त्यांची (i) पत्नी श्रीमती रजनी कार्तिक, (ii) आई श्रीमती प्रभा बालन आणि (iii) मुलगा मास्टर प्रद्युन कार्तिक (तेव्हा अल्पवयीन) हेच मागे राहिले. दिनांक ०४.०८.२०१४ च्या नोंदणीकृत क्षतिपूर्ती बंधपत्राद्वारे, सदर श्रीमती प्रभा बालन यांनी घोषित केले की त्यांनी सदर मिळकतीवरील आपला हक्क, मालकी आणि हितसंबंध त्यांची सून श्रीमती रजनी कार्तिक यांच्या लाभात सोडले आहेत आणि त्यांना त्यांच्या वतीने विक्री करार निष्पादित करण्यासाठी व विक्रीचा मोबदला स्वीकारण्यासाठी प्राधिकृत केले आहे, तथापि, सदर मृत व्यक्तीच्या संदर्भात सक्षम न्यायालयाकडून कोणतेही कायदेशीर वारस प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही. त्यानंतर, दिनांक २६.०६.२०१४ च्या दोन स्वतंत्र नोंदणीकृत विक्री करारांद्वारे श्रीमती रजनी कार्तिक यांनी सदर मिळकत एका श्रीमती इव्हेंजेलिन ग्लॅडिन आणि श्री. ग्लॅडिन डॅनियल यांना विकली, सदर सोसायटीने त्यांना सभासद म्हणून सामावून घेतले आणि शेअर प्रमाणपत्र त्यांच्या संयुक्त नावांवर हस्तांतरित केले. त्यानंतर, दिनांक ०४.११.२०२० च्या स्थावर मालमत्तेच्या दोन स्वतंत्र नोंदणीकृत बक्षीसपत्रांद्वारे, श्री. ग्लॅडिन डॅनियल यांनी सदर मिळकतीमधील आपला अविभाजित वाटा एका श्रीमती इव्हेंजेलिन ग्लॅडिन (माहेरचे नाव इव्हेंजेलिन गॅब्रिएल) यांना बक्षीस म्हणून दिला, या परिस्थितीत, श्रीमती इव्हेंजेलिन ग्लॅडिन (माहेरचे नाव इव्हेंजेलिन गॅब्रिएल) या सदर मिळकतीच्या पूर्ण मालक बनल्या आणि सोसायटीने त्यांना सभासद म्हणून सामावून घेतले व शेअर प्रमाणपत्र त्यांच्या नावे हस्तांतरित केले. त्यानंतर, माझे अशील १). श्रीमती लक्ष्मीदेवी अजय विश्वकर्मा आणि २). श्री. अजय शिवनाथ विश्वकर्मा यांनी संयुक्तपणे सदर मिळकत श्रीमती इव्हेंजेलिन ग्लॅडिन यांच्याकडून दिनांक २६.०६.२०१४ च्या दोन स्वतंत्र नोंदणीकृत विक्री करारांद्वारे खरेदी केली.
कोणत्याही व्यक्तीचा सदर मिळकतीवर आणि/किंवा सदर मिळकतीच्या मूळ मालकी हक्क दस्तऐवजांवर/कागदपत्रांवर विक्री, गहाण, अभिहस्तांकन, प्रभार, विश्वस्त, धारणाधिकार, ताबा, बक्षीस, वारसा हक्क, देखभाल, कुळवाट, भाडेपट्टा, सुखाधिकार किंवा इतर कोणत्याही मार्गाने कोणताही दावा किंवा हितसंबंध असल्यास, त्यांनी या नोटिशीच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर खालील स्वाक्षरीकर्त्यांना त्या पुष्ट्यर्थ कागदोपत्री पुराव्यांसह (आणि इतर कोणत्याही प्रकारे नाही) लेखी स्वरूपात कळवणे आवश्यक आहे; अन्यथा माझे अशील असे गृहीत धरतील की सदर मिळकत सर्व भारांपासून मुक्त आहे आणि त्यानंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही दाव्याचा विचार केला जाणार नाही व तो सोडून दिला असल्याचे मानले जाईल.

**ठिकाणः मुंबई**
**दिनांकः १२.०८.२०२६**

**सही/-**
**श्रीमती सावित्री नवीन पुजारी**
**वकील, उच्च न्यायालय,**
३०१, तिसरा मजला, स्टर्लिंग सीएचएस लिमिटेड, लक्ष्मीनारायण मंदिराजवळ,
एकसर, बोरीवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९१

---

## सेंटरेक टेक्नॉलॉजीज लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालयः ३०७, रीजेंट चेंबर्स, नरिमन पॉईंट, मुंबई, महाराष्ट्र, ४०००२१
ई-मेलः **info@centerac.com**; वेबसाइटः **www.centerac.com**; सीआयएनः **L17231MH1993PLC071975**

**३० जून, २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलेखापरीक्षित आर्थिक निकाल**

(रु. लाखांत)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही ३० जून, २०२६ (अलेखापरीक्षित) | संपलेली तिमाही ३१ मार्च, २०२६ (लेखापरीक्षित) | संपलेली तिमाही ३० जून, २०२५ (अलेखापरीक्षित) | संपलेले वर्ष ३१ मार्च, २०२६ (लेखापरीक्षित) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ऑपरेशन्समधून एकूण उत्पन्न (निव्वळ) | ४.८९ | ४०.९१ | ६.८४ | ७४.३७ |
| २ | या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा असामान्य बाबींपूर्वी) | (१६.९९) | २०.५९ | (३.९९) | २.९९ |
| ३ | करापूर्वी या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असामान्य बाबींनंतर) | (१६.९९) | २०.५९ | (३.९९) | २.९९ |
| ४ | करानंतर या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असामान्य बाबींनंतर) | (१६.९९) | २०.५९ | (३.९९) | २.९९ |
| ५ | या कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (या कालावधीसाठीचा नफा/(तोटा) (करानंतर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) समाविष्ट) | (१६.९९) | २०.५९ | (३.९९) | २.९९ |
| ६ | इक्विटी शेअर भांडवल | ११०.३५ | ११०.३५ | ११०.३५ | ११०.३५ |
| ७ | इतर इक्विटी | - | - | - | - |
| ८ | प्रति शेअर उत्पन्न (प्रत्येकी रु. १/- चे दर्शनी मूल्य) | | | | |
| | मूळ (रु.) | (०.१५) | ०.१९ | (०.०४) | ०.०३ |
| | सौम्यकृत (रु.) | (०.१५) | ०.१९ | (०.०४) | ०.०३ |

टिपाः
१) अ. वरील लेखापरीक्षित निकालांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन करून शिफारस केली आहे आणि ११ ऑगस्ट, २०२६ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत संचालक मंडळाने त्यांना मान्यता दिली आहे.
ब. हे निकाल कंपनी (भारतीय लेखा मानके) नियम, २०१५ चा नियम ३ आणि कंपनी (भारतीय लेखा मानके) सुधारणा नियम, २०१६ सह वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत विहित केलेल्या भारतीय लेखा मानकांनुसार तयार करण्यात आले आहेत.
क. सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ३३ नुसार आवश्यक असलेले लेखापरीक्षण कंपनीच्या लेखापरीक्षकांनी पूर्ण केले आहे आणि त्यांनी सुधारित निष्कर्ष व्यक्त केला आहे.
२) वर्षअखेरीच्या आर्थिक निकालांचे संपूर्ण स्वरूप स्टॉक एक्स्चेंजच्या वेबसाइट्स म्हणजेच www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाइट www.centerac.com वर उपलब्ध आहे.

ठिकाणः मुंबई
दिनांकः ११ ऑगस्ट, २०२६

संचालक मंडळासाठी आणि त्यांच्या वतीने
सेंटरेक टेक्नॉलॉजीज लिमिटेड
सही/-
सबीन मोहम्मद इक्बाल
पूर्ण वेळ संचालक आणि सीएफओ
डीआयएनः ०३५५७५३४

---

## शिव ओम स्टील्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालयः** ५१५, द समिट बिझनेस बे, सिनेमॅक्सच्या समोर, वेस्टर्न एक्स्प्रेस वे, ए.के. रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००९३.
**दूरध्वनीः** ०२२-२६८२७९००/०१/०२/०३/०४ **सीआयएनः** L27105MH2002PLC135117
**वेबसाईटः** www.shivaumsteels.com **ईमेलः** cs@shivaumsteels.com, info@shivaumsteels.com

**३० जून, २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

(रु. लाखांत)

| अ. क्र. | तपशील | एकत्रित निष्कर्ष: संपलेली तिमाही ३०.०६.२०२६ (अलेखापरीक्षित) | संपलेली तिमाही ३१.०३.२०२६ (अलेखापरीक्षित) | संपलेली तिमाही ३०.०६.२०२५ (अलेखापरीक्षित) | संपलेले वर्ष ३१.०३.२०२६ (अलेखापरीक्षित) |
|---|---|---|---|---|---|
| १ | एकूण उत्पन्न | १४,५७८.३५ | १६,४५३.४९ | ११,५९२.२० | ५७,७५७.०२ |
| २ | या कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (कर, अपवादात्मक आणि / किंवा असाधारण बाबींपूर्वी) | ५०७.९१ | ४९३.०१ | २२२.४७ | ९१६.४७ |
| ३ | या कालावधीसाठी करापूर्वीचा निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि / किंवा असाधारण बाबींनंतर) | ५०७.९१ | ४९३.०१ | २२२.४७ | ९१६.४७ |
| ४ | या कालावधीसाठी करानंतरचा निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि / किंवा असाधारण बाबींनंतर) | ३७८.९० | ४१०.८५ | १५२.६० | ७२०.११ |
| ५ | या कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर या कालावधीसाठी नफा/ तोटा आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) समाविष्ट) | ५७१.८३ | १४४.५६ | २९२.६४ | ५४७.४४ |
| ६ | इक्विटी शेअर भांडवल | १३६०.०४ | १३६०.०४ | १३६०.०४ | १३६०.०४ |
| ७ | राखीव निधी (वित्तीय निष्कर्षात दर्शविल्याप्रमाणे पुनर्मूल्यांकन राखीव निधी वगळून) | - | - | - | १०,७२२.५२ |
| ८ | प्रति शेअर मिळकत (प्रत्येकी ₹ १०/-) (सुरू असलेल्या आणि खंडित ऑपरेशन्ससाठी) - १. मूळ : | २.७९ | ३.०२ | १.१२ | ५.२९ |
| | २. सौम्यकृतः | २.७९ | ३.०२ | १.१२ | ५.२९ |

**स्टँडअलोन वित्तीय निष्कर्षांचे प्रमुख आकडे**
सेबी (एलओडीआर) च्या नियम ४७(१) (ब) नुसार कंपनीची स्टँडअलोन वित्तीय माहितीः

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ऑपरेशन्समधून एकूण उत्पन्न | १३,८९३.८५ | १५,४३६.५३ | ११,३१३.३५ | ५३,७२४.३६ |
| करापूर्वी निव्वळ नफा/ (तोटा) | ४९३.४६ | ५३१.७४ | २३२.५५ | ९४८.४८ |
| करानंतर निव्वळ नफा/ (तोटा) | ३६८.०९ | ४३८.०० | १६१.०३ | ७४४.१० |

**टीपः**
१. वित्तीय निष्कर्षांच्या सविस्तर टीपा स्टॉक एक्स्चेंज आणि कंपनीच्या https://www.shivaumsteels.com/ या वेबसाईटवर उपलब्ध आहेत आणि खाली दिलेल्या क्यूआर कोडद्वारे देखील त्या पाहता येतील.

**दिनांकः** ११ ऑगस्ट, २०२६
**ठिकाणः** मुंबई

शिव ओम स्टील्स लिमिटेड करिता
सही/-
संजय नरेंद्र बन्सल
संचालक
डीआयएनः ००२३५५०९

---

## किफ्स हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालयः** ६वा मजला, किफ्स कॉर्पोरेट हाऊस, हॉटेल प्लॅनेट लँडमार्कच्या बाजूला, अशोक वाटिका जवळ, बीआरटीएस, इस्कॉन - आंबली रोड, बोडकदेव, आंबली, अहमदाबाद, गुजरात - ३८००५४.
**कॉर्पोरेट कार्यालयः** सी-९०२, लोटस पार्क, ग्रॅहम फर्थ कंपाऊंड, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०००६३, महाराष्ट्र, भारत.
**दूरध्वनी क्र.:** +९१ २२ ६१७९६४०० **ई-मेलः** contact@kifshousing.com **वेबसाईटः** www.kifshousing.com
**सीआयएनः** U65922GJ2015PLC085079 **आरबीआय सीओआरः** DOR00145-

### प्रत्यक्ष ताबा नोटीस

**१. सद्दाम अख्तर गाझी (अर्जदार)**
**२. रोनी सद्दाम गाझी (सह-अर्जदार)**
**मालमत्तेचा पत्ताः** निवासी मालमत्तेचा सर्व तो भाग आणि पार्सल, ज्यामध्ये फ्लॅट क्र. २०१, वज्रेश्वरी माता अपार्टमेंट सीएचएसएल, २रा मजला, बी विंग, सर्व्हे क्र. ८७, हिस्सा क्र. ०१, फुलपाडा रोड, मराठी माध्यम शाळेच्या मागे, विरार (पूर्व), महाराष्ट्र-४०१३०५ यांचा समावेश आहे.
**ज्याअर्थी,**
किफ्स हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी म्हणून खालील स्वाक्षरीकर्त्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक **१९/१०/२०२५** रोजी एक मागणी नोटीस जारी केली होती. या नोटिशीद्वारे तुम्हाला तुमचे **ॲप क्र. 24167 आणि 1009324, लॅन क्र. LNHEVIR015297 आणि LNHLVIR001068** च्या संदर्भात नोटिशीत नमूद केलेली **रक्कम रु. ७,२५,५००/- (अक्षरी रुपये सात लाख पंचवीस हजार पाचशे मात्र) आणि रु. ८,५३,७७६/- (अक्षरी रुपये आठ लाख त्रेपन्न हजार सातशे शहात्तर मात्र)** सदर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत भरण्याचे आवाहन केले होते.
तुम्ही सदर रकमेची परतफेड करण्यात अपयशी ठरल्याने, याद्वारे तुम्हाला आणि सर्वसामान्य जनतेला नोटीस देण्यात येते की, खालील स्वाक्षरीकर्त्यांनी सदर नियमांच्या नियम ८ सह वाचल्या जाणाऱ्या सदर कायद्याच्या कलम १३(४) अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आज दिनांक **०८/०८/२०२६** रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे, जी किफ्स हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकडे गहाण आहे.
विशेषतः तुम्हाला आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी या मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार हा दिनांक १२/०९/२०२५ रोजी थकीत असलेली रक्कम **रु. ७,२५,५००/- (अक्षरी रुपये सात लाख पंचवीस हजार पाचशे मात्र) आणि रु. ८,५३,७७६/- (अक्षरी रुपये आठ लाख त्रेपन्न हजार सातशे शहात्तर मात्र)** आणि त्यावरील **दिनांक १३ सप्टेंबर, वर्ष २०२५** पासूनची रक्कम प्रत्यक्ष जमा होईपर्यंतच्या पुढील व्याजाच्या रकमेसाठी किफ्स हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या प्रभाराच्या अधीन राहील.

**मालमत्तेचे वर्णन**

निवासी मालमत्तेचा सर्व तो भाग आणि पार्सल, ज्यामध्ये फ्लॅट क्र. २०१, वज्रेश्वरी माता अपार्टमेंट सीएचएसएल, २रा मजला, बी विंग, सर्व्हे क्र. ८७, हिस्सा क्र. ०१, फुलपाडा रोड, मराठी माध्यम शाळेच्या मागे, विरार (पूर्व), महाराष्ट्र-४०१३०५ यांचा समावेश आहे. **चतुःसीमा तपशील खालीलप्रमाणेः पूर्वेसः** अंतर्गत रस्ता **पश्चिमेसः** वज्रेश्वरी अपार्टमेंट **उत्तरेसः** मराठी शाळा **दक्षिणेसः** जीवदानी दर्शन अपार्टमेंट

**ठिकाणः विरार**
**दिनांकः ०८/०८/२०२६**

**सही/- प्राधिकृत अधिकारी**
**किफ्स हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

---

## बॉम्बे टॉकीज लिमिटेड

**सीआयएनः L65990MH1984PLC033919**
**२०१, २रा मजला, नवनीलम प्रिमिसेस सोसायटी, १०८, एस. पी. रोड, वरळी, मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००१८. फोनः +९१ ९१६७३४६८८९**
**ई-मेलः btl.invstcomp@rediffmail.com वेबसाईटः bombaytalkieslimited.in/**
**इंडियन अकाउंटिंग स्टँडर्ड्स (इंड-एएस) च्या अनुपालनानुसार तयार केलेले ३० जून, २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी बॉम्बे टॉकीज लिमिटेडचे अलेखापरीक्षित आर्थिक निकाल**

**अलेखापरीक्षित आर्थिक निकालांचे विवरण**
**३० जून, २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी**

(रक्कम रु. लाखांत)

| तपशील | संपलेली तिमाही ३०.०६.२०२६ (अलेखापरीक्षित) | संपलेली तिमाही ३०.०६.२०२५ (अलेखापरीक्षित) | संपलेले वर्ष ३१.०३.२०२६ (लेखापरीक्षित) |
|---|---|---|---|
| ऑपरेशन्समधून एकूण उत्पन्न (निव्वळ) | ७.३२२ | ८.०९८ | १४.६५२ |
| या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा विशेष बाबींपूर्वी) | -६.३९७ | -६.८२९ | -१६.८५६ |
| या कालावधीसाठी करापूर्वीचा निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा विशेष बाबींनंतर) | -६.३९७ | -६.८२९ | -१६.८५६ |
| या कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न [या कालावधीसाठी नफा/(तोटा) (करानंतर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) मिळून] | -६.३९७ | -६.८२९ | -१६.८६२ |
| भरणा झालेले इक्विटी शेअर भांडवल | ५४०.०० | ५४०.०० | ५४०.०० |
| राखीव निधी (पुनर्मूल्यांकन राखीव निधी वगळून) | - | - | -७०.२७१ |
| प्रति इक्विटी शेअर उत्पन्न (प्रत्येकी रु. १/-) (सुरू असलेल्या आणि खंडित ऑपरेशन्ससाठी) | | | |
| (अ) मूळः | - | - | - |
| (ब) सौम्यकृतः | - | - | - |

टीपाः
१. वरील निकालांचे ऑडिट कमिटीने पुनरावलोकन केले आहे आणि मंगळवार, ११ ऑगस्ट, २०२६ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत संचालक मंडळाने त्यांची नोंद घेतली आहे.
२. वरील माहिती ही सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन, २०१५ च्या नियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजकडे दाखल केलेल्या संपलेल्या तिमाहीच्या स्टँडअलोन आर्थिक निकालांच्या सविस्तर स्वरूपाचा एक अर्क आहे. संपलेल्या तिमाहीच्या अलेखापरीक्षित स्टँडअलोन आर्थिक निकालांचे संपूर्ण स्वरूप स्टॉक एक्स्चेंजच्या वेबसाईटवर (www.bseindia.com) आणि कंपनीच्या वेबसाईटवर (https://bombaytalkieslimited.in/) उपलब्ध आहे.
३. वरील निकाल हे कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत निर्धारित केलेल्या कंपनी (इंडियन अकाउंटिंग स्टँडर्ड्स) नियम, २०१५ ('इंड-एएस') सोबत वाचल्या जाणाऱ्या कंपनी (इंडियन अकाउंटिंग स्टँडर्ड्स) नियम, २०१५ च्या नियम ३ आणि इतर संबंधित मान्यताप्राप्त लेखा तत्त्वे आणि धोरणांनुसार तयार करण्यात आले आहेत.

**बॉम्बे टॉकीज लिमिटेड साठी**
**सही/-**
**(तानिया रवींद्र कोल्हटकर)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**डीआयएनः ०९२९९८३९**

**दिनांकः ११ ऑगस्ट, २०२६**
**ठिकाणः मुंबई**

---

### मुंबई येथील मुंबई शहर दिवाणी न्यायालयात
### लाँग कॉज सूट क्र. २७४९ सन १९९९

**लिंक पॅलेस को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.,** महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यांतर्गत नोंदणीकृत संस्था, जिचे कार्यालय लिंक पॅलेस, राजनपाडा, मालाड (पश्चिम), मुंबई - ४०००६४ येथे आहे.
**..... वादी**

**-: विरुद्ध :-**

**१. बृहन्मुंबई महानगरपालिका,** जिचे मुख्य कार्यालय महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१ येथे आहे.
~~२. रिनाऊन कन्स्ट्रक्शन कंपनी~~
**२ः रिनाऊन कन्स्ट्रक्शन कंपनी प्रा. लि.,** जिचे कार्यालय १००, एस्प्लेनेड मॅन्शन, १ला मजला, मुंबई - ४०००२३ येथे आहे आणि तसेच विठ्ठल निवास, काँग्रेस हाऊसजवळ, लॅमिंग्टन रोड, व्ही. पी. रोड, मुंबई - ४००००९ येथे आहे.
**३. प्रताप माने,** ~~प्रतिवादी~~ क्र. २ चे प्रोप्रायटर (Proprietor), वगळण्यात आले, संचालक (निधन) २३/०२/२०२५, ज्यांचा पत्ता विठ्ठल निवास, लॅमिंग्टन रोड, व्ही. पी. रोड, मुंबई - ४००००९ येथे आहे.
**४. के. के. डेव्हलपर्स,** २३६/२३८, सॅम्युअल स्ट्रीट, मशीद बंदर रोड, मुंबई - ४००००३.
**५. टेक्नो बिल्ड प्रायव्हेट लिमिटेड,** जिचे कार्यालय ९/१०, भावेश्वर कॉम्प्लेक्स, किरोळ, विद्याविहार, मुंबई - ४०००८६ येथे आहे.
**६.** ~~सुदामा शांताराम मांडेलकर,~~ मयत झाल्याने वगळण्यात आले.
**७.** ~~विठ्ठलभाई एस. मांडेलकर,~~ मयत झाल्याने वगळण्यात आले.
~~७अ. श्री भगवान-सुदामा मांडळकर - (मुलगा-प्रतिवादी क्र. ८)~~.... दिनांक २४/०२/२०२६ च्या आदेशानुसार वगळण्यात आले.
**७ब. श्रीमती सुगंधा रामनाथ माने,** (विवाहित मुलगी) वय सुमारे ७४ वर्षे, व्यवसायः गृहिणी.
**७क. श्रीमती सुरेखा सुरेश पालवणकर,** (विवाहित मुलगी) वय सुमारे ७२ वर्षे, व्यवसायः गृहिणी.
**७ड. श्रीमती अंजली अशोक निगवेकर,** (विवाहित मुलगी) वय सुमारे ७० वर्षे, व्यवसायः गृहिणी.
**श्रीमती सुहासिनी सुधाकर येळमकर,** (विवाहित मुलगी) दिनांक १९.०९.२०२३ रोजी किंवा त्यासुमारास मयत, त्यांच्या कायदेशीर वारसांमार्फतः
**७इ. ओंकार सुधाकर** ~~येळमकर (मुलगा)~~ दिनांक २४/०२/२०२६ च्या आदेशानुसार वगळून नव्याने जोडले.
**७फ. रचना राकेश गोरे,** सुहासिनी येळमकर यांची विवाहित मुलगी.
**७ग. श्रीमती प्रज्ञा प्रभाकर माने,** (विवाहित मुलगी) वय सुमारे ६६ वर्षे, व्यवसायः गृहिणी.
**श्रीमती मनाली मनोहर कोळंबेकर** (विवाहित मुलगी), दिनांक ११.०३.२०२३ रोजी किंवा त्यासुमारास मयत, त्यांच्या कायदेशीर वारसांमार्फतः
**७ह. चिराग मनोहर कोळंबेकर** (मुलगा). या सर्वांचा प्रतिवादी क्र. ८ च्या पत्त्याप्रमाणे सामायिक पत्ता आहे, म्हणजे १५०/ए, शांताराम निवास, कुंभारवाडा, एस. जी. मार्ग, मालाड (पश्चिम), मुंबई - ४०००६४.
**८. भगवान एस. मांडळकर,** दिनांक २४/०२/२०२६ च्या आदेशानुसार वगळून नव्याने जोडले. क्र. ७ आणि ८ या दोघांचा पत्ताः चिंचोली, गाव मालाड, मालाड (पश्चिम), मुंबई.
**..... प्रतिवादी**

यावरून नोटीस देण्यात येते की, वादींच्या वतीने खालील दाद/दिलासा मिळवण्यासाठी हे प्रकरण या माननीय न्यायालयात, माननीय न्यायाधीश श्री. एम. एच. पठाण यांच्यासमोर कोर्ट रूम क्र. ०८ मध्ये दिनांक १७.०८.२०२६ रोजी सकाळी ११.०० / दुपारी २.४५ वाजता किंवा त्यानंतर वकील उपस्थित राहू शकतील तेव्हा सुनावणीसाठी पुकारले जाईलः
**अ)** या माननीय न्यायालयाने असे घोषित करावे की, वादी हे महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट्स अक्ट अंतर्गत दाव्यातील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या मोबदल्यात दाव्यातील मालमत्तेचे हस्तांतरण मिळविण्यास पात्र आहेत आणि प्रतिवादी क्र. २, ३ आणि ७, ८ **(तसेच ७ब ते ७ह)** यांना वादींच्या बाजूने हस्तांतरण पत्र निष्पादित करण्याचे निर्देश देण्यात यावेत.
**ब)** प्रतिवादी क्र. २, ३ आणि ७, ८ (तसेच ७ब ते ७ह) असे करण्यात अपयशी ठरल्यास, या माननीय न्यायालयाने त्यांच्या जागी या न्यायालयाच्या एका अधिकाऱ्याची दाव्यातील मालमत्तेचे हस्तांतरण पत्र निष्पादित करण्यासाठी नियुक्ती करावी.
**क)** प्रतिवादी क्र. १ ला वादीस प्रथम भोगवटा प्रमाणपत्र दिल्याशिवाय आणि वादी क्र. १ ला नियमित पाणी जोडणी दिल्याशिवाय दाव्यातील मालमत्तेवर कोणतीही परवानगी देण्यापासून किंवा कोणतेही काम करण्यास अनुमती देण्यापासून कायमस्वरूपी मनाई हुकुमाद्वारे रोखण्यात यावे.
**ड)** या माननीय न्यायालयाने कायमस्वरूपी मनाई हुकुमाद्वारे प्रतिवादी क्र. १, ५ आणि ६ आणि प्रतिवादी क्र. ७, ८ (तसेच ७ब ते ७ह) किंवा त्यांच्यामार्फत किंवा त्यांच्या अधिकारात दावा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला वादीच्या विशिष्ट परवानगी किंवा संमतीशिवाय दाव्यात 'प्रदर्श ए' मध्ये दर्शविल्याप्रमाणे अस्तित्वात असलेल्या बागेत कोणतेही बांधकाम करण्यापासून किंवा कोणताही बदल किंवा नुकसान करण्यापासून रोखावे.
**डड)** प्रतिवादी क्र. ४ आणि ५, त्यांचे नोकर, एजंट आणि कंत्राटदार यांना अनिवार्य आदेशाद्वारे आदेश आणि निर्देश दिले जावेत की त्यांनी प्रतिवादी क्र. ४ आणि ५ यांनी केलेले अनधिकृत बांधकाम पाडून टाकावे.
**इ)** या दाव्याची सुनावणी आणि अंतिम निकाल प्रलंबित असेपर्यंत, प्रतिवादी क्र. १ ला वादीस प्रथम भोगवटा प्रमाणपत्र दिल्याशिवाय आणि वादी क्र. १ ला नियमित पाणी जोडणी दिल्याशिवाय दाव्यातील मालमत्तेवर कोणतीही परवानगी देण्यापासून किंवा कोणतेही काम करण्यास अनुमती देण्यापासून तात्पुरत्या मनाई हुकुमाद्वारे रोखण्यात यावे.
**फ)** या दाव्याची सुनावणी आणि अंतिम निकाल प्रलंबित असेपर्यंत, या माननीय न्यायालयाने तात्पुरत्या मनाई हुकुमाद्वारे प्रतिवादी क्र. १, ५ आणि ६ आणि प्रतिवादी क्र. ७, ८ **(तसेच ७ब ते ७ह)** किंवा त्यांच्यामार्फत किंवा त्यांच्या अधिकारात दावा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला वादीच्या विशिष्ट परवानगी किंवा संमतीशिवाय दाव्यात 'प्रदर्श ए' मध्ये दर्शविल्याप्रमाणे अस्तित्वात असलेल्या बागेत कोणतेही बांधकाम करण्यापासून किंवा कोणताही बदल किंवा नुकसान करण्यापासून रोखावे.
ग) वरील प्रार्थना (इ) आणि (फ) नुसार अंतरिम दाद मिळावी;
ह) या न्यायालयाला योग्य वाटेल अशी इतर आणि पुढील दाद मिळावी, आणि
आय) या दाव्याचा खर्च मंजूर करण्यात यावा.
दिनांक १८ जुलै २०२६.

शिक्का

**सही/-**
**सीलर**
**सही/-**
**निबंधकांकरिता**
**दिंडोशी येथील शहर दिवाणी न्यायालय**

**आज दिनांक १८ जुलै २०२६**
**शोभा यादव** - वादींच्या वकील
शगून आर्केड जी-६८, जन. अरुण कुमार वैद्य मार्ग, गोरेगाव पूर्व, मुंबई - ४०००९७ आणि एफ-४८, एक्सप्रेस झोन, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, मालाड पूर्व, मुंबई - ४०००९७.

---

## आयडियाफोर्ज टेक्नॉलॉजी लिमिटेड

ideaForge Create. Inspire

**सीआयएनः** L31401MH2007PLC167669
**नोंदणीकृत कार्यालयः** ईएल - १४६, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, इलेक्ट्रॉनिक झोन, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई, महाराष्ट्र ४००७१०.
**वेबसाईटः** www.ideaforgetech.com **ईमेलः** compliance@ideaforgetech.com **दूरध्वनीः** +९१ (२२) ६७८७ १००७

**३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलेखापरीक्षित (स्टँडअलोन आणि कन्सोलिडेटेड) वित्तीय निकालांचे विवरण.**

आयडियाफोर्ज टेक्नॉलॉजी लिमिटेड ('कंपनी') च्या संचालक मंडळाने १० ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत, ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी कंपनीच्या अलेखापरीक्षित (स्टँडअलोन आणि कन्सोलिडेटेड) वित्तीय निकालांना (वित्तीय निकाल*) मंजुरी दिली. मर्यादित पुनरावलोकन अहवालासह हे वित्तीय निकाल स्टॉक एक्स्चेंजच्या www.nseindia.com आणि www.bseindia.com या वेबसाईट्सवर तसेच कंपनीच्या https://ideaforgetech.com/investor-relations/news-and-announcements या वेबसाईटवर उपलब्ध आहेत आणि क्यूआर कोड स्कॅन करून ते पाहता येतील.

**आयडियाफोर्ज टेक्नॉलॉजी लिमिटेड करिता,**
**सही/-**
**अंकित मेहता**
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पूर्णवेळ संचालक
डीआयएनः 02108289

ठिकाणः नवी मुंबई दिनांकः १२ ऑगस्ट २०२६
**टीपः** वरील माहिती सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन, २०१५ च्या नियम ४७(१) सह वाचल्या जाणाऱ्या नियम ३३ च्या अनुषंगाने आहे.

---

## वाशू भगनानी इंडस्ट्रीज लिमिटेड

सीआयएन क्र.: **L68100MH1986PLC040559**
नोंदणीकृत कार्यालयः फ्लॅट नं १, कोएल्हो हाऊस, नं २ जुहू वसंत बहार सीएचएस लिमिटेड, जुहू तारा रोड, जुहू, सी प्रिन्सेस हॉटेलजवळ, जुहू, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००४९
दूरध्वनीः ९०९६७९६४०४,
वेबसाइटः **http://vashubhagnaniindustries.com**
ई-मेलः **cs@poojaentertainment.in**

**३० जून, २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलेखापरीक्षित आर्थिक निकाल**

(रु. लाखांत)

| तपशील | स्टँडअलोन: संपलेली तिमाही ३१.०३.२०२६ (लेखापरीक्षित) | संपलेली तिमाही ३१.०३.२०२६ (लेखापरीक्षित) | संपलेली तिमाही ३०.०६.२०२५ (अलेखापरीक्षित) | संपलेले वर्ष ३१.०३.२०२६ (लेखापरीक्षित) | एकत्रित: संपलेली तिमाही ३०.०६.२०२६ (अलेखापरीक्षित) | संपलेली तिमाही ३१.०३.२०२६ (लेखापरीक्षित) | संपलेली तिमाही ३०.०६.२०२५ (अलेखापरीक्षित) | संपलेले वर्ष ३१.०३.२०२६ (लेखापरीक्षित) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑपरेशन्समधून महसूल | १६.७२ | ६.६९ | २५.६५ | ७०९.२२ | २५२.०९ | २३०.९४ | १४५.८८ | १,४४१.८५ |
| करापूर्वी या कालावधीसाठी नफा/(तोटा) | २१.०० | २.७९ | ४.२८ | १८९.५२ | ३८.५१ | (२३५.९४) | ९६.०९ | ३७८.३५ |
| करानंतर या कालावधीसाठी नफा/(तोटा) | १८.६४ | ७.४२ | २.७३ | १४०.६६ | ३५.९१ | (२३१.३१) | ९४.५४ | ३१३.०९ |
| या कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न [या कालावधीसाठीचा नफा / (तोटा) (करानंतर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) समाविष्ट] | १८.६४ | ७.४२ | २.७३ | १४०.६६ | ३१.३० | (१६०.४९) | ९२.९१ | ४४८.९४ |
| निव्वळ नफा खालीलपैकी कोणाचाः | | | | | | | | |
| अ) कंपनीचे मालक | - | - | - | - | ३५.८६ | (२३१.५६) | ९५.०५ | ३१५.७९ |
| ब) अ-नियंत्रक हितसंबंध | - | - | - | - | ०.०५ | ०.२५ | (०.५१) | (२.७०) |
| भरणा झालेले इक्विटी शेअर भांडवल (दर्शनी मूल्य रु. १०/- प्रति शेअर) | ६,३९५.३५ | ६,३९५.३५ | ५,५४३.८५ | ६,३९५.३५ | ६,३९५.३५ | ६,३९५.३५ | ५,५४३.८५ | ६,३९५.३५ |
| इतर इक्विटी (पुनर्मूल्यांकन राखीव निधी वगळून राखीव निधी) | - | - | - | ६,८५३.८९ | - | - | - | ८,३९१.३९ |
| प्रति शेअर उत्पन्न (ईपीएस) (प्रत्येकी रु. १०/- चे) (वार्षिक नाही) मूळ आणि सौम्यकृत ईपीएस (जून २०२५ साठी प्रत्यक्ष - ०.००४) | ०.०३ | ०.०१ | | ०.२२ | ०.०६ | (०.३६) | ०.०१ | ०.४९ |

टिपाः
१. वरील माहिती ही सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजकडे दाखल केलेल्या ३० जून, २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीच्या अलेखापरीक्षित आर्थिक निकालांच्या सविस्तर स्वरूपाचा एक अर्क आहे. संपलेल्या तिमाहीच्या अलेखापरीक्षित आर्थिक निकालांचे संपूर्ण स्वरूप स्टॉक एक्स्चेंजची वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाइट http://vashubhagnaniindustries.com/ वर उपलब्ध आहे.
२. वरील निकालांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले आहे आणि ११ ऑगस्ट, २०२६ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत संचालक मंडळाने त्यांना मान्यता दिली आहे.

ठिकाणः मुंबई
दिनांकः ११-०८-२०२६

वाशू भगनानी इंडस्ट्रीज लिमिटेडसाठी
सही/-
पूजा भगनानी
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएनः ०००४४५९३